वाचले:-

१) सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक प्रशा/5/कावि/701/2022 दिनांक 21/06/2022

२) **क्षेत्रीय अधिकारी,ग क्षेत्रीय कार्यालय** यांचे पत्र क्र. **गक्षेका**/प्रशा/1/कावि/232/2025 दिनांक 20/02/2025

३) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1).

४) अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/1/कावि/1175/2013.दिनांक 29/08/2013

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 411018.
क्र:सा**प्रशा/5/कावि/224/2025**
दिनांक :- 10 / 03 / 2025

**विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तिबाबत.......**
**श्री. काळभोर गोपाळ धोंडीबा पदनाम –मजूर,( संगणक क्रमांक 13350)**

आदेश,

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. कडील श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा** यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील गट **ड** मधील **मजूर** या पदावर वाचले क्रमांक 1 चे आदेशान्वये कायम स्वरुपी सामावून घेतले आहे. श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा** यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख 01/06/1965 अशी असून दिनांक 31/05/2025 रोजी त्यांच्या वयास 60 वर्ष पूर्ण होत आहेत

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1) नुसार गट **ड** मधील कर्मचा-यांना वयाची 60 वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

**क्षेत्रीय अधिकारी, ग क्षेत्रीय कार्यालय** यांनी उपरोक्त वाचले क्रमांक 2 चे पत्रान्वये, श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा**, **मजूर** यांचेकडून म.न.पा.चे **नवीन घर कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज, सोसायटी कर्ज व वैद्यकीय अग्रिम येणे** बाकी नाही. **तसेच एकुण 34 दिवस विनावेतनी केल्याचे दिसुन येत आहे.** सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून,त्यांना दिनांक 31/05/2025 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेकामी शिफारस केली आहे.

सबब, **क्षेत्रीय अधिकारी, ग क्षेत्रीय कार्यालय** यांचेकडील दिनांक 20/02/2025 रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक 4 वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा, मजूर** यांना दिनांक 31/05/2025 रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा, मजूर** यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता पुणे महानगर परिवहन महामंडळाकडुन प्राप्त झाले नंतर सबंधित विभागाने प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे.लेखा विभाग व पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी एकमेकांशी समन्वय साधुन श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा, मजूर** यांचेकडून अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय?या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास, ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा** पदनाम - **मजूर** यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 411018.

प्रति,
श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा, मजूर**

प्रत :- 1) लेखा विभाग 2) मुख्य लेखापरिक्षण 3) वैयक्तिक नोंद कक्ष 4) गोपनिय अहवाल कक्ष 5) सेवाज्येष्ठता कक्ष 6) मागासवर्ग कक्ष 7) संगणक कक्ष - प्रशासन 10) विद्युत विभाग 11) दूरसंचार विभाग 12) कामगार कल्याण विभाग 13) पि. चि. म. न. पा. कर्मचारी महासंघ 14) पि. चि. म. न. पा. सह. पतसंस्था 15) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

16) **ग क्षेत्रीय कार्यालय**

2/- सोबत श्री. **काळभोर गोपाळ धोंडीबा,** पदनाम - **मजूर** यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.